स्थायी निदेश क्र. २०-२०२५

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०१(४) अन्वये जिल्हाधिकारी यांनी द्यावयाच्या मंजुरीबाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका इमारत,**
**७ मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी.बेलापूर मुंबई ४००६१४**
**क्र.नपप्रस/प्र.क्र20/स्थायी नि./२०/२०२५/नप./औ.न.अधि.१९६५/क. १०१(४)जिल्हा.मं./ कक्ष-१२/1282**
**दिनांक -:** 17 FEB 2025

**संदर्भ :-**

१) या संचालनालयाचे पत्र आयएनएस १००२/प्र.क्र.१८/२००२/कार्या-६, दिनांक ०५ मार्च,२००२.

**प्रस्तावना:-**

सदर निदेशामध्ये संदर्भीय पत्रामधील मुद्दा क्र. ४ मधील अर्थसंकल्प मंजुरीबाबत निदेशांमध्ये कायद्यातील तरतुदीप्रमाणे काही निदेश समाविष्ट करणे आवश्यक आहे.

**आदेश:-**

उक्त अधिनियमांचे कलम १०१(४) अन्वये जिल्हाधिकारी यांच्याकडे पुढील दोन प्रकरणात अर्थसंकल्प मंजूरीसाठी सादर केला जाईल.

१) नगर परिषदेने शासनाकडून कर्ज घेतले असेल किंवा नगर परिषदेने खुल्या बाजारात किंवा अन्यरीतीने उभारलेल्या कोणत्याही कर्जाबद्दल शासनाने हमी घेतली असेल तेव्हा नगरपरिषदेचा अर्थसंकल्प महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०१ (१) ४ अन्वये आगाऊ मंजूरीसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात येईल. कलम १०१ (१) ४ नुसार जिल्हाधिकारी आगाऊ मंजुरी देत असताना संचालकांनी दिलेल्या सर्वसाधारण निदेशांनुसार मंजुरी देईल.

खालील निदेशांनुसार मंजुरी द्यावी.

१. शासनाचे कर्ज कोणत्या कारणासाठी घेतले आहे, त्या कारणासाठी इतर अनुदान खर्चाची तरतूद असतानाही कर्ज घेतले आहे काय? याबाबत खात्री करावी.

२. ज्या कारणासाठी कर्ज घेतले आहे त्यासाठीच कर्जाचा वापर होत आहे किंवा नाही याबाबत खातरजमा करावी. शासनाकडून घेतलेल्या कर्जाच्या रकमेचा

इतर कारणासाठी खर्च केलेला नसावा. याबाबत अर्थ संकल्पास मंजुरी देताना खात्री करावी.

३. शासनाच्या कर्जाची परतफेड करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे किंवा नाही याबाबत खात्री करावी, शासनाचे कर्ज परतफेड करणेबाबत अर्थसंकल्पात तरतूद करणे (कलम ९० ड व ९० इ नुसार) बंधनकारक आहे.

४. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९० क, ९० ड, ९० ई(इ), ९०फ, ९० ग, ९० ह, ९० आय (ई), ९० जे(ज), अंतर्गत तरतुदींचे पालन करण्यात आले आहे किंवा नाही याची खातरजमा करावी.

५. तसेच उपरोक्त कलमान्वये कर्ज निवारण निधी उभारण्यात आला आहे किंवा नाही याबाबत खात्री करावी.

६. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता २०१३ मधील प्रकरण १९ मधील नियम क्र.२८१ ते २८८ या नियमांचे पालन करण्यात आले किंवा नाही हे पाहावे. तसेच नियम क्र. ६२ आणि ६४ तसेच ६५(१) व नियम क्र. २८४ नमुना २३ प्रमाणे कर्ज नोंदवही ठेवण्यात आली आहे किंवा नाही याची खात्री करावी.

२) नगर परिषदेने, २८ फेब्रुवारी रोजी किंवा तत्पूर्वी, अर्थसंकल्प स्वीकृत करण्यात कसर केली तर, अध्यक्ष ताबडतोब तो अर्थसंकल्प मान्यतेसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करील.

प्रकरण परत्वे सदर बाब जिल्हाधिकारी यांच्या लक्षात आणून द्यायची जबाबदारी मुख्याधिकारी यांची असेल. तसे न केल्यास त्याची जबाबदारी वैयक्तिकरित्या मुख्याधिकाऱ्यावर राहील.

३) नगरपरिषदेचा अर्थसंकल्प प्रतिवर्षी मार्चच्या पहिल्या सप्ताहात आवश्यक त्या सर्व प्रपत्रासह जिल्हाधिकारी यांचेकडे मान्यतेसाठी मुख्याधिकारी यांनी(उक्त नियमाचे कलम १०१(४) नुसार) सादर करावयाचा आहे.

४) मुख्याधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे अर्थसंकल्प मंजुरीचा प्रस्ताव उशिरा सादर केल्यास त्याची जबाबदारी वैयक्तिकरित्या मुख्याधिकारी याचेवर राहील.

५) उक्त अधिनियमाचे कलम १०१(४) अन्वये जिल्हाधिकारी यांचेकडे मंजुरीसाठी दाखल झालेल्या अर्थसंकल्प मंजुरीचे प्रस्तावावर जिल्हाधिकाऱ्यांनी तीस दिवसात निर्णय घ्यावा.

६) वरील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी यांची मंजुरी मिळेपर्यंत नगरपरिषदा फक्त ३ महिने मुदतीपर्यंत आस्थापना व आकस्मिक खर्च या व्यतिरिक्त अन्य प्रकारे खर्च करू शकत नाही.जर असा खर्च केल्यास वैधानिक तरतुदीचे पालनात कुचराई केली म्हणून मुख्याधिकारी/संबंधित पदाधिकारी व नगरपरिषद अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल

Manoj Vijay Ranade
Digitally signed by Manoj Vijay Ranade
Date: 2025.02.17 13:32:12 +05'30'

**(मनोज रानडे भा.प्र.से)**
**आयुक्त तथा संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई**

प्रत माहितीसाठी अग्रेषित :

१) मा. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व).
३) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
४) सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, सर्व विभाग.
५) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई (सर्व कार्यासन).
६) निवड नस्ती.

प्रति,

१) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व).
२) अध्यक्ष/ प्रशासक ,नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व).
३) मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व)